युद्धविरामामुळे बाजारामध्ये चैतन्य

▸ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. स्थानिक शेअर बाजारात बुधवारी जोरदार तेजी दिसून आली, बीएसई सेन्सेक्स २,९४६ अंकांनी वाढला, तर एनएसई निफ्टी २४,००० च्या जवळ पोहोचला. पश्चिम आशियातील दोन आठवड्यांच्या शस्त्रसंधीचा, जागतिक बाजारातील तेजीचा आणि कच्च्या तेलाच्या किमतीतील घसरणीचा देशांतर्गत बाजारावर सकारात्मक परिणाम झाला. बाजारात सलग पाचव्या दिवशी तेजी दिसून आली. ३०-शेअर असलेला बीएसई सेन्सेक्स २,९४६.३२ अंकांनी किंवा ३.९५ टक्क्यांनी वाढून ७७,५६२.९० अंकांवर बंद झाला. व्यवहारादरम्यान तो ३,०१८.९६ अंकांनी वाढून ७७,६३५.५४ अंकांवर पोहोचला होता. ५०-शेअर असलेला एनएसई निफ्टी ८७३.७० अंकांनी किंवा ३.७८ टक्क्यांनी वाढून २३,९९७.३५ अंकांवर बंद झाला. व्यवहारादरम्यान तो ९०१.५ अंकांनी वाढून २४,०२५.१५ अंकांवर पोहोचला होता. सेन्सेक्स कंपन्यांमध्ये, इंटरग्लोब एव्हिएशनने ८.२२ टक्क्यांची सर्वाधिक वाढ नोंदवली. ऑनलाइन ट्रेडिंग आणि वेल्थ टेक फर्म 'एनरिच मनी'चे सीईओ पोनमुडी आर. म्हणाले की, शस्त्रसंधीच्या घोषणेमुळे जोखीम टाळण्याची प्रवृत्ती लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. त्यामुळे भारताच्या अस्थिरता निर्देशांकात २० टक्क्यांहून अधिक घट झाली आहे, जे अनिश्चिततेत वेगाने घट झाल्याचे दर्शविते. ही सकारात्मक भावना जागतिक बाजारांमध्येही दिसून आली. बीएसई-सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल मागील सत्रातील ४२९ लाख कोटींवरून ४४६ लाख कोटींवर पोहोचले.

क्षेपणास्त्रे थांबल्याने गुंतवणूकदारांची १७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक

२,९४६ अंकांनी वधारला सेन्सेक्स | **३,०१८.९६** अंकांची वाढ व्यहारादरम्यान | **५,६१५.३५** अंकांची वाढ ५ दिवसांत

8.22% ची वाढ इंटरग्लोब एव्हिएशनमध्ये

२४,००० च्या जवळ बंद झाला निफ्टी

४४६ लाख कोटी रुपयांवर बाजार भांडवल

२०% पेक्षा घसरला भारताचा अस्थिरता निर्देशांक

८% वाढ ५ दिवसांत



४७ पैशांनी वधारला रुपया

५ ट्रेडिंग दिवसांत ७.४६% वाढ

शेअर बाजारात सलग पाच दिवस तेजी दिसून आली आहे. आकडेवारीनुसार, बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचा प्रमुख निर्देशांक, सेन्सेक्स, ३० मार्च रोजी ७१,९४७.५५ अंकांवर बंद झाला होता. तेव्हापासून त्यात ५,६१५.३५ अंकांची वाढ झाली आहे. याचा अर्थ सेन्सेक्सने या महिन्यात गुंतवणूकदारांना ७.८० टक्के परतावा दिला आहे. दरम्यान, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा प्रमुख निर्देशांक, निफ्टी, यातही ५ ट्रेडिंग दिवसांत ७.४६ टक्क्यांची वाढ झाली. ३० मार्च रोजी निफ्टी २२,३३१.४० अंकांवर बंद झाला. त्यानंतर त्यात १,६६५.९५ अंकांची वाढ झाली आहे.

डॉलरच्या तुलनेत रुपयाची भरारी

बुधवारी रुपया ४७ पैशांनी वधारून प्रति डॉलर ९२.५९ वर बंद झाला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील लष्करी हल्ले दोन आठवड्यांसाठी स्थगित करण्याची घोषणा केल्याने आण आरबीआयने प्रमुख धोरणात्मक दर अपरिवर्तित ठेवण्याच्या निर्णयामुळे देशांतर्गत चलनास बळकटी मिळाली. आंतरबँक परकीय चलन बाजारात रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९२.९२ वर उघडला. सुरुवातीला तो ९२.५६ पर्यंत वाढला आणि मागील बंद भावापेक्षा ४७ पैशांच्या वाढीसह ९२.५९ वर बंद झाला.

हे ठरले शेअर्स बाजाराचे हिरो

शेअर	वाढ
अदाणी ग्रीन	११%
इंडिगो	८.२२%
एलटी	७.६४%
बजाज फायनान्स	७.०३%
मारुती	६.३३%
एचडीएफसी	५.७१%
अदानी पोर्ट्स	५.२८%
रिलायन्स	३.३०%

कच्चे तेल: जागतिक तेल मानक असलेल्या ब्रेंट क्रूडमध्ये १३.८९ टक्क्यांची घसरण होऊन ते प्रति बॅरल ९४.०९ डॉलरवर आले.

परदेशी बाजारपेठा: इतर आशियाई बाजारपेठांमध्ये, दक्षिण कोरियाचा कोस्पी ६.८७ टक्क्यांनी आणि जपानचा निक्केई २२५ ५.३९ टक्क्यांनी वाढला. चीनचा शांघाय एस.एस.ई. कंपोझिट आणि हाँगकाँगचा हँग सेंग हे निर्देशांकही वधारले. दुपारच्या सत्रात प्रमुख युरोपीय बाजारपेठांमध्ये तेजी दिसून आली.

जनतेला दिलासा; कंपन्यांवर अद्यापही संकट

तेल कंपन्यांना दिवसाला २ हजार कोटी नुकसान

▸ संतोष ठाकूर। नवराष्ट्र

दिल्ली. अमेरिका-इराण युद्धाच्या या संकटकाळात, जगभरात तेलाच्या वाढत्या किमतींमुळे भारतीय तेल कंपन्यांवर दररोज २,००० कोटी रुपयांचा बोजा पडत आहे. याचे कारण असे की, सरकार जास्त किमतीत तेल खरेदी करून ते जनतेला सामान्य दरात पुरवत आहे.अमेरिका आणि इराण यांच्यातील सशर्त करारानंतर, भविष्यात भारताचा तेल आणि वायू पुरवठा वाढू शकतो. याचे कारण म्हणजे, या करारामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मोठ्या प्रमाणावर जहाजांना वाहतूक करण्याची परवानगी मिळेल. त्यामुळे अनेक अडकलेली भारतीय जहाजे एकाच वेळी मायदेशी परत येऊ शकतील. देशातील एलपीजी संकट, विशेषतः वायू संकट कमी करण्यासाठी हे एक मोठे यश ठरू शकते. दरम्यान, असे समोर आले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विश्वासार्हता आणि पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी यांच्या राजनैतिक संबंधांमुळे भारताला जगभरातील देशांकडून अखंडितपणे तेल आणि वायू मिळत आहे, ज्याला जागतिक स्तरावर एक मोठा राजनैतिक विजय मानले जात आहे. सध्या, जगभरातील देशांना पैसे देऊनही भारताला तेल आणि वायू मिळत नाही, तर दुसरीकडे जगभरातील देश भारताला सातत्याने तेल आणि वायूचा पुरवठा करत आहेत.असे वृत्त आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अखंड पुरवठा सुनिश्चित केल्याबद्दल पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी यांची प्रशंसा केली. या बैठकीदरम्यान, अनेक मंत्र्यांनी हे मान्य केले की, भारतीय परराष्ट्र सेवेचे माजी यशस्वी अधिकारी असलेल्या हरदीप पुरी यांनी जगभरातील आपले वैयक्तिक संबंध उपयुक्त असल्याचे सिद्ध केले आहे. बैठकीदरम्यान पंतप्रधानांनी यावर जोर दिला.

एलपीजीचा पुरवठा सुरळीत

वृत्त असे की, अमेरिका-इराण युद्धाच्या या संकटकाळात, जगभरात वाढणाऱ्या तेलाच्या किमतींमुळे भारतीय तेल कंपन्यांवर दररोज २,००० कोटी रुपयांचा बोजा पडत आहे. याचे कारण असे की, सरकार जास्त किमतीत तेल खरेदी करून ते जनतेला सामान्य दरात पुरवत आहे. तथापि, सरकारने जनतेवर भार न टाकण्याचा निर्णय घेतला आहे. एका अंदाजानुसार, या तिमाहीत तेल कंपन्यांचे नुकसान सुमारे ४४,००० कोटी रुपये असू शकते. असे असूनही, जनतेवर भार टाकण्यात आलेला नाही आणि दिलासा देण्यात आला आहे. तेलाव्यतिरिक्त, सरकारने एलपीजीचा पुरवठाही अखंडित ठेवला आहे, त्यामुळे घरगुती ग्राहकांना कोणतीही अडचण आली नाही. देशात एलपीजीचा पुरवठा सुरळीतपणे सुरू आहे.

शेअर

बीएसई	७७,५६२.९०	(▲ २९४६.३२)
निफ्टी	२३,९९७.३५	(▲ ८७३.७०)

सोने चांदी

सोने स्टँडर्ड (10 ग्रॅम)
नागपूर १,५२,८००(▲)
मुंबई १,५२,६००(▲)

चांदी (प्रतिकिग्रॅ)
नागपूर २,४८,८००(▲) मुंबई २,४७,८००(▲)

₹/डॉलर (प्रति डॉलर) ९२.५९
कच्चे तेल (प्रति बॅरल) ९४.०९

Short News

एफसीएलची कोटींचे व्याज, मुद्दल देयकांत चूक

दिल्ली. फ्युचर कंझ्युमर लिमिटेड (एफसीएल) मार्च २०२६ अखेरपर्यंत बँका, वित्तीय संस्था आणि असूचीबद्ध कर्ज रोख्यांकडून घेतलेल्या ६१५.६७ कोटी रुपयांच्या कर्जावरील व्याज आणि मुद्दल देयकांमध्ये अयशस्वी ठरली आहे. कर्जबाजारी फ्युचर ग्रुपची एफएमसीजी शाखा असलेल्या एफसीएलने ३१ मार्च २०२६ पर्यंत बँका आणि वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या ३२५.२६ कोटी रुपयांच्या कर्ज आणि इतर रोख सुविधांच्या देयकांमध्ये चूक केली होती. कंपनीने शेअर बाजारांना कळविले आहे की, यामध्ये बँकांकडून घेतलेल्या मुद्दल आणि व्याज या दोन्हींचा समावेश आहे.

युद्धबंदीनंतर बॉण्ड यील्ड घसरले

मुंबई. अमेरिका आणि इराण यांच्यातील दोन आठवड्यांच्या सशर्त शस्त्रसंधीमुळे आणि आरबीआयने पॉलिसी रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवण्याच्या निर्णयामुळे, बुधवारी भारतीय बॉण्ड यील्ड सुमारे ०.१२ टक्क्यांनी घसरून ७ टक्क्यांखाली आले. सकाळच्या सत्रात १०-वर्षीय बेंचमार्क बॉण्डवरील यील्ड ७.०४ टक्क्यांवरून ६.९२ टक्क्यांवर घसरले.

टाटा समूहासाठी एअर इंडिया ठरली 'बर्डन'

तोटा २०००० कोटींवर पोहोचला

▸ दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. टाटा सन्सचे नवीन व्यवसाय अपेक्षित वाढ दाखवत नाहीत, त्यामुळे कंपनीवरील आर्थिक दबाव वाढत आहे. अहवालानुसार, या नवीन उपक्रमांमधील एकूण तोटा आर्थिक वर्ष २०२६ च्या अखेरीस अंदाजे २९,००० कोटींपर्यंत पोहोचू शकतो, जो पूर्वीच्या अंदाजापेक्षा अधिक आहे. या वाढत्या तोट्याचा कंपनीच्या भविष्यातील योजनांवर परिणाम होऊ शकतो, कारण अशा परिस्थितीत विस्तार धोरणावर अतिरिक्त दबाव येणे स्वाभाविक आहे. एअर इंडिया सध्या समूहाचा सर्वाधिक तोटा करणारा व्यवसाय विभाग म्हणून उदयास आला आहे. हा तोटा मोठ्या गुंतवणुकीमुळे आणि वाढत्या परिचालन खर्चामुळे दिसून येत आहे. असा अंदाज आहे की आर्थिक वर्ष २०२६ मध्ये त्याचा तोटा अंदाजे २०,००० कोटींपर्यंत पोहोचू शकतो, तर आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांतच अंदाजे १५,००० कोटींचा तोटा झाला आहे. मागील आर्थिक वर्षात हा आकडा सुमारे ११,००० कोटी रुपये होता. आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की कंपनी प्रचंड दबावाखाली आहे. टाटा सन्सच्या नवीन व्यवसायांमध्ये तोट्यात झपाट्याने वाढ होत आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांतच अंदाजे २१,७०० कोटी रुपयांचा तोटा नोंदवला गेला आहे.

नो बॅन ; विक्री किंमत वाढविण्याचा विचार सुरू: अन्न सचिव

साखर निर्यात सुरूच राहणार

▸ दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. देशांतर्गत पुरवठा वाढविण्यासाठी साखर निर्यातीवर बंदी घालण्याचा कुठलाही प्रस्ताव नाही आणि किमान विक्री वाढविण्याच्या उद्योगाच्या मागणीवर सरकार विचार करत आहे, अन्न सचिव संजीव चोप्रा यांनी मंगळवारी सांगितले. सचिवांनी सांगितले, साखरेचे भाव स्थिर आहेत आणि पुरेशा देशांतर्गत पुरवठ्यामुळे भावात आणखी वाढ होण्याची शक्यता नाही. अतिरिक्त इथेनॉल उत्पादन क्षमतेचा उपयोग करण्याच्या मार्गांचा विचार करण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन करण्यात आली आहे, ज्यात पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण सध्याच्या २० टक्क्यांवरून वाढविण्याचा समावेश आहे. चोप्रा म्हणाले, खाद्यतेलावरील आयात शुल्क कमी करण्याचा कुठलाही प्रस्ताव नाही. सचिवांनी सांगितले की, सध्या काढणी सुरू असलेले गव्हाचे पीक यावर्षी चांगले आहे. अलीकडील पावसामुळे सरकार अन्नधान्य खरेदीसाठीचे गुणवत्ता निकष शिथिल करू शकते. सध्या तरी साखर निर्यातीवर बंदी घालण्याचा कोणताही प्रस्ताव नाही, असे चोप्रा यांनी येथील परिषदेदरम्यान एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. देशांतर्गत पुरवठा वाढविण्यासाठी संभाव्य निर्यात बंदीच्या वृत्तांविषयी त्यांना विचारण्यात आले. ते म्हणाले, पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक किमती मजबूत झाल्यात. त्यामुळे भारताच्या निर्यातीच्या शक्यता सुधारल्या आहेत. जर निर्यात मंजूर प्रमाणापेक्षा कमी झाली, तर अंतिम साखरेचा साठा अधिक असेल, परिणामी पुढील विपणन वर्षांत अधिक साखर इथेनॉल उत्पादनाकडे वळवण्यासाठी लवचिकता मिळेल. साखरेची किमान विक्री किंमत ३१ रुपये प्रति किलोवरून वाढवण्याच्या उद्योगाच्या मागणीबाबत ते म्हणाले, अन्न मंत्रालय या प्रस्तावावर विचार करत आहे.

साखरेच्या किमती स्थिर

इथेनॉल मिश्रण कार्यक्रमामुळे २०१४ पासून १.७५ लाख कोटींची भरीव परकीय चलन बचत झाली. साखरेच्या किमती स्थिर राहिल्या आहेत. किमतींमध्ये वाढ किंवा दरवाढ होण्याची मला अपेक्षा नाही. परिस्थिती नियंत्रणात आहे आणि निर्यात व इथेनॉल मिश्रण कार्यक्रमातून रोख रक्कम मिळत असल्याने साखर कारखाने शेतकऱ्यांना पैसे देतील, अशी अपेक्षा आहे.

ईएमआयचा भार राहणार कायम

▸ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर वाढत्या महागाईचा धोका लक्षात घेऊन भारतीय रिझर्व्ह बँकेने बुधवारी अपेक्षेप्रमाणे धोरणात्मक दर, रेपो दर, ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवला. त्यामुळे ईएमआयचा भार कायम राहणार आहे. आरबीआयने 'प्रतीक्षा करा आणि पहा' या भूमिकेचा अवलंब करत सावध भूमिका घेतली आहे. चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ चा पहिला द्वैमासिक पतधोरण आढावा अशा वेळी होत आहे, जेव्हा पश्चिम आशियातील सुमारे ४० दिवसांच्या युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे इंधन आयातीवर अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशांवर महागाईचा दबाव वाढला आहे. तथापि, अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील शस्त्रसंधीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत सुधारणा होण्याची आशाही वाढली आहे. ६ एप्रिलपासून सुरू झालेल्या तीन दिवसीय बैठकीत सहा सदस्यीय पतधोरण समितीने (एमपीसी) घेतलेल्या या निर्णयांची घोषणा करताना आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले की, एमपीसीने रेपो दर ५.२५ टक्क्यांवर ठेवण्याचा एकमताने निर्णय घेतला आहे. ते म्हणाले की, पतधोरण समितीने पतधोरणाबाबत 'तटस्थ' भूमिका कायम ठेवली आहे.

आर्थिक विकासदर ६.९% अपेक्षित

आरबीआयने चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी भारताचा आर्थिक विकास दर ६.९ टक्के राहील, असा अंदाज वर्तविला आहे, जो आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी अंदाजित ७.६ टक्क्यांपेक्षा कमी आहे. आरबीआयने बुधवारी सांगितले की, वस्तूंच्या वाढलेल्या किमती आणि पश्चिम आशिया संकटामुळे पुरवठा साखळीत निर्माण झालेला व्यत्यय यांसारख्या चिंतांमुळे विकास मंदावू शकतो. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी पहिले द्वैमासिक पतधोरण जाहीर करताना, आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले की, प्रमुख सागरी मार्गांमधील व्यत्यय आणि त्यामुळे मालवाहतूक व विमा खर्चात होणारी वाढ यांचा माल निर्यातीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. सेवा क्षेत्रातील सातत्यपूर्ण मजबुती, वस्तू आणि सेवा कर दरांच्या सुसूत्रीकरणाचा परिणाम, उत्पादन क्षेत्रातील वाढलेला क्षमता वापर आणि वित्तीय संस्था व कंपन्यांची मजबूत ताळेबंद स्थिती देशांतर्गत मागणीला आधार देईल.

बंगळुरू, मुंबईचा क्रमांक : कर्ज १.३ अब्ज डॉलर्सवर पोहोचले

कर्ज देण्यामध्ये दिल्ली अव्वल

▸ दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. भारतात स्टार्टअप्सच्या माध्यमातून व्यवसाय चालविणाऱ्या लोकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. परिणामी दिल्ली-एनसीआर तीन प्रमुख शहरांमध्ये कर्ज उपलब्धतेत अव्वल स्थानी पोहोचली आहे. त्यानंतर बंगळुरू आणि मुंबईचा क्रमांक लागतो. बुधवारी प्रसिद्ध झालेल्या एका अहवालात, स्ट्राइड व्हेंचर्सने म्हटले की, भारतातील स्टार्टअप्सना मिळालेल्या कर्जांची संख्या वाढली. त्यामुळेच, कुठलाही हिस्सा न घेता दिले जाणारे व्हेंचर कर्ज २०२५ मध्ये १.३ अब्ज डॉलर्सवर पोहोचले आहे, तर मोठ्या कंपन्यांच्या विस्तारासाठीचे ग्रोथ लोन १.६८ अब्ज डॉलर्सवर पोहोचले आहे. अहवालानुसार, हा ट्रेंड स्टार्टअप्सना वित्तपुरवठा करण्याच्या पद्धतीत एका मोठ्या बदलाचे संकेत देतो. पूर्वी, या प्रकारचे कर्ज कंपन्यांच्या रोख गरजा पूर्ण करण्यापुरते मर्यादित होते, मात्र, आता त्याचा वापर विस्तार, अधिग्रहण आणि व्यवसाय मजबूत करण्यासाठी केला जात आहे. अहवालानुसार, २०२५ मध्ये अंदाजे १८७ स्टार्टअप्सना व्हेंचर डेट मिळाले.

पार्किंग, लँडिंग शुल्कात कपात

विमान कंपन्यांना दिलासा

▸ दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. भारताची विमानतळ दर नियामक संस्था, एअरपोर्ट इकॉनॉमिक रेग्युलेटरी अथॉरिटीने (एईआरए) प्रमुख विमानतळांना देशांतर्गत उड्डाणांसाठीचे लँडिंग आणि पार्किंग शुल्क तात्पुरते २५ टक्क्यांनी कमी करण्याचे निर्देश दिलेत. हा दिलासा तीन महिन्यांसाठी असून, इराण संघर्षामुळे दबावाखाली असलेल्या विमान कंपन्यांना आधार देणे हा याचा उद्देश आहे. वाढता खर्च आणि पाकिस्तानवरून जाणाऱ्या उड्डाणांवरील बंदी या दुहेरी दबावाखाली असलेल्या इंडिगो आणि एअर इंडियासारख्या विमान कंपन्यांच्या मागणीनंतर हा निर्णय घेण्यात आला.

एईआरएने स्पष्ट केले, ही कपात तत्काळ लागू होईल. तथापि, त्यामुळे होणाऱ्या महसुलातील तोट्याची भरपाई भविष्यातील दर पुनरावलोकनादरम्यान केली जाईल. इंधन आणि कर्मचाऱ्यांच्या पगारानंतर विमानतळ आणि हवाई वाहतूक शुल्क हा विमान उद्योगाचा तिसरा सर्वांत मोठा खर्च आहे. या निर्णयामुळे कंपन्यांना काहीसा दिलासा मिळेल.

आता आयपीओ वैधतेला मुदतवाढ

दिल्ली. आखाती संकटाच्या पार्श्वभूमीवर, बाजार नियामक सेबीने प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ) मंजुरीची वैधता ३० सप्टेंबरपर्यंत वाढविली आहे. तसेच किमान सार्वजनिक भागधारणेच्या नियमांचे पालन न करणाऱ्या संस्थांना एक-वेळची सूटही दिली आहे. या निर्णयामुळे, बाजारातील अनिश्चित परिस्थितीमुळे ज्या कंपन्यांनी आपल्या सार्वजनिक प्रस्तावाच्या योजना पुढे ढकलल्या आहे किंवा त्यांचे वेळापत्रक बदलले आहे, त्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. बाजार नियामकाच्या टिप्पण्या, म्हणजेच मंजुरी पत्रे, ज्यांची मुदत १ एप्रिल २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान संपत आहे, ती आता ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत वैध राहतील. १२ महिने किंवा १८ महिन्यांच्या आत त्यांचे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

खरेदीत सवलतींपेक्षा सोयीला प्राधान्य

दिल्ली. भारतातील खरेदीच्या पद्धती झपाट्याने बदलत आहेत. आता सवलतींऐवजी सोय हा ग्राहकांसाठी खरेदीचा मुख्य पर्याय बनला आहे. ग्रँट थॉर्नटन इंडियाच्या एका अहवालानुसार ७० टक्क्यांहून अधिक ग्राहक म्हणतात की, सवलती कमी झाल्या तरीही ते इन्स्टंट कॉमर्स प्लॅटफॉर्मचा वापर सुरू ठेवतील. ग्राहकांच्या पसंतीमध्ये लक्षणीय बदल झाला, आता किमतीपेक्षा वेग उपलब्धतेला प्राधान्य दिले जात आहे.

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

E-Tender Notice

The e-tender dully filled in and digitally signed are invited from eligible/Registered and authorized reputed firm/contractor for the following works under Urban Division, Amravati MSEDCL. Tender No. T-24 for Work contract for hiring of 2 Nos. Ladder Mounted Utility Vehicle for FY 2026-27 under O&M Urban Sub-Division No. I, Amravati, Tender No. T-25 for Work contract for hiring of 2 Nos. Ladder Mounted Utility Vehicle for FY 2026-27 under O&M Urban Sub-Division No. II, Amravati, Tender No. T-26 for Work contract for hiring of 2 Nos. Ladder Mounted Utility Vehicle for FY 2026-27 under B&R Urban Sub-Division No. I, Amravati & Tender No. T-27 for Work contract for hiring of 2 Nos. Ladder Mounted Utility Vehicle for FY 2026-27 under B&R Urban Sub-Division No. II, Amravati. Tender fee details in web site including GST. The tender details/documents are available at our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ w.e.f 09.04.2026 to 16.04.2026.

PRO. 89/2026

EXECUTIVE ENGINEER,
URBAN DIVISION, AMRAVATI

भारतीय कपास निगम लिमिटेड
THE COTTON CORPORATION OF INDIA LTD
(भारत सरकार का उपक्रम वस्त्र मंत्रालय) / (Govt. of India Undertaking-Ministry of Textiles)
शाखा कार्यालयः अकोला / Branch Office: AKOLA.

दूरभाष/Phone No:- 0724-2400354 ई-मेल/e-mail: akola@cotcorp.com
वेबसाईट/Website: www.cotcorp.org.in
मंत्रालय वेबसाइट/Ministry website: texmin.nic.in
सीआयएन/CIN: U51490MH1970G01014733

No.CCI/AKOLA/Fire Claim/2025-26/ 08/04/2026

खुली निलामी सूचना/ OPEN AUCTION NOTICE
(आग और पानी से प्रभावित कपास साल्वेज)/
(SALVAGE OF FIRE & WATER AFFECTED KAPAS)

निगम, इच्छुक खरीदारों को अग्नी एवं पानी से प्रभावित कपास के साल्वेज की बिक्री के लिए निगम द्वारा आयोजित की जाने वाली खुली नीलामी में भाग लेने के लिए आमंत्रित करता है, जो पूरी तरह से "जैसा है जहां है" के आधार पर एकमुश्त बोलियों पर होगी। क्षतिग्रस्त साल्वेज की जाँच कार्यालयीन समय मे सागर इंडस्ट्रीज, गट नंबर 369/1, मोहबतपुर, हंतोडा फाटा, दर्यापुर रोड, अंजनगांव सुर्जी, जिला अमरावती में पूर्व अनुमती से की जा सकती है। खुली निलामी दिनांक 16.04.2026 को सायं 03:00 बजे उक्त दर्शाई गई फैक्ट्री में होगी। खुली निलामी में भाग लेने हेतु अमानत राशि 5000/- (राशी पांच हजार केवल) है। खुली निलामी के विस्तृत नियम और शर्तों के लिए, पार्टियाँ शाखा से संपर्क कर सकती हैं या निगम की वेबसाइट www.cotcorp.org.in या सरकारी टेंडर पोर्टल www.eprocure.gov.in पर देख सकती हैं।

The Corporation invites interested buyers to participate in Open Auction to be conducted by Corporation for sale of fire and water affected kapas salvage strictly on "As Is Where Is" basis on Lump-Sum bids. The Salvage kapas can be inspected during office hours by visiting at Sagar Industries, Gat No.369/1, Mohabatpur, Hantoda Phata, Daryapur Road, Anjangaon Surji, Dist. Amaravati with prior appointment. Open Auction shall be held on 16.04.2026 at 03:00 PM at above mentioned factory. The EMD for participating in Open Auction is Rs. 5,000/- (Rs. Five Thousand Only). For detailed terms and conditions of Open Auction, parties may contact branch or visit Corporation's website www.cotcorp.org.in or Govt. tender portal www.eprocure.gov.in.

उप महा प्रबन्धक / Dy. General Manager

बुलडाणा नगरपरिषद कार्यालय बुलडाणा
जिल्हा बुलडाणा

ई-निविदा सूचना / 2025-2026

जा.क्र./वि.वि./नपबु/1423/2025-2026
दिनांक :- 07/04/2026

मुख्याधिकारी नगर परिषद बुलडाणा यांचे वतीने अधिकृत/नोंदणीकृत कंत्राटदार, पुरवठादार, कंत्राटदार, यांचेकडून बुलढाणा नगर परिषद अंतर्गत वैशिष्टपूर्ण योजना विशेष अनुदान सन 2023-2024 मौजे बुलडाणा नगर परिषद हद्दीतील मनोरंजन केंद्र इमारतीचे इंटरनल विद्युत इलेक्ट्रिकफिकेशन करणे आवश्यक आहे. सदर काम नगर परिषद तपशील करावयाचे असून सदर कामाचा तपशील, निर्देशन खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	कामाचा तपशील	अंदाजित किंमत	अनामत रक्कम	ई-निविदा फार्म रक्कम
1	2	3	4	5
1	बुलढाणा नगर परिषद अंतर्गत वैशिष्टपूर्ण योजना विशेष अनुदान सन 2023-2024 मौजे बुलडाणा नगर परिषद हद्दीतील मनोरंजन केंद्र इमारतीचे इंटरनल विद्युत इलेक्ट्रिकफिकेशन करणे.	रु. 871187/-	रु. 10000/-	रु. 1,000/-

ई निविदेचा कोरा नमुना http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळा वर दिनांक 08/04/2026 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून ते दि. 15/04/2026 रोजी दुपारी 05.00वाजेपर्यंत उपलब्ध राहील. परिपूर्ण रित्या भरलेल्या ई-निविदा दिनांक 15/04/2026 रोजी सभा दुपारी 05.00 वाजेपर्यंत व त्यापूर्वी स्विकरण्यात येतील. तसेच उपरोक्त कामासाठी प्राप्त ई-निविदा दिनांक 16/04/2026 रोजी सकाळी 11.00 वाजे नंतर उघडण्यात येईल. ई-निविदा बाबतच्या सविस्तर अटी, शर्ती व नियम उपरोक्त संकेतस्थळा वर पाहवयास उपलब्ध आहेत. तरी इच्छुक संस्थेनी/कंत्राटदारानी नोंद घ्यावी व ई-निविदा प्रक्रिया करावी. कोणतीही ई-निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

मुख्याधिकारी
नगर परिषद बुलडाणा

बुलडाणा नगरपरिषद कार्यालय बुलडाणा
जिल्हा बुलडाणा

ई-निविदा सूचना / 2025-2026

जा.क्र./वि.वि./नपबु/1424/2025-2026
दिनांक :- 07/04/2026

मुख्याधिकारी नगर परिषद बुलडाणा यांचे वतीने अधिकृत/नोंदणीकृत कंत्राटदार, पुरवठादार, कंत्राटदार, यांचेकडून बुलढाणा नगर परिषद अंतर्गत वैशिष्टपूर्ण योजना विशेष अनुदान सन 2023-2024 मौजे बुलडाणा नगर परिषद हद्दीतील वृद्धाश्रम इमारतीचे इंटरनल विद्युत इलेक्ट्रिकफिकेशन करणे आवश्यक आहे. सदर काम नगर परिषद तपशील करावयाचे असून सदर कामाचा तपशील, निर्देशन खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	कामाचा तपशील	अंदाजित किंमत	अनामत रक्कम	ई-निविदा फार्म रक्कम
1	2	3	4	5
1	बुलढाणा नगर परिषद अंतर्गत वैशिष्टपूर्ण योजना विशेष अनुदान सन 2023-2024 मौजे बुलडाणा नगर परिषद हद्दीतील वृद्धाश्रम इमारतीचे इंटरनल विद्युत इलेक्ट्रिकफिकेशन करणे.	रु. 472000/-	रु. 5000/-	रु. 1,000/-

ई निविदेचा कोरा नमुना http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळा वर दिनांक 08/04/2026 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून ते दि. 15/04/2026 रोजी दुपारी 05.00वाजेपर्यंत उपलब्ध राहील. परिपूर्ण रित्या भरलेल्या ई-निविदा दिनांक 15/04/2026 रोजी सभा दुपारी 05.00 वाजेपर्यंत व त्यापूर्वी स्विकरण्यात येतील. तसेच उपरोक्त कामासाठी प्राप्त ई-निविदा दिनांक 16/04/2026 रोजी सकाळी 11.00 वाजे नंतर उघडण्यात येईल. ई-निविदा बाबतच्या सविस्तर अटी, शर्ती व नियम उपरोक्त संकेतस्थळा वर पाहवयास उपलब्ध आहेत. तरी इच्छुक संस्थेनी/कंत्राटदारानी नोंद घ्यावी व ई-निविदा प्रक्रिया करावी. कोणतीही ई-निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

मुख्याधिकारी
नगर परिषद बुलडाणा

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

शाखा - वाडी, नागपूर
प्लॉट नं.296/297, काटोल बायपास रोड, पूजा धरम काटा, वाडी, नागपूर-440023

वाहन ई-लिलाव सूचना

याद्वारा सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदारांना आणि जमानतदारांना सूचना देण्यात येत आहे की बँकेने पक्षांनी केलेल्या गहाणखत/कर्ज करारांतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले गहाण असलेले मोटार वाहन परत ताब्यात घेतले/जप्त केले आहे आणि खाली नमूद केलेल्या खात्यांमधील थकबाकी वसूल करण्यासाठी वाहन **"जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे"** आणि **"जे काही आहे ते"** या आधारावर विकले जाईल. कर्जदार/जमानतदार/वाहन/एकूण देय/राखीव किंमत/ई-लिलाव तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली खालीप्रमाणे-

अनु. क्र	कर्जदार/जमानतदार/ यांचे नाव आणि पत्ता	एकुण देय	वाहन निर्माता आणि मॉडेल आरटीओ नोंदणी क्रमांक	1. ई-लिलावाची तारीख आणि वेळ 2. बोली सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ	1. राखीव किंमत 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) 3. बिड वाढीव रक्कम	ईएमडी ठेव खाते क्रमांक आयएफएससी कोड शाखा	वाहन / चल मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ
1	श्री.लेखराज रामरावजी कावरे पत्ता : प्लॉट नं.8, शशिकांत गृहनिर्माण संस्था, गोरेवाडा रोड, उत्थान नगर, काटोल रोड, नागपूर-13	रु. 28,69,480.69 अधिक व्याज आणि कायदेशिर शुल्क	मालमत्ता आयडी : BARBMH40CM6379 नोंदणी क्रमांक : MH-40-CM-6379 नोंदणीची तारीख : 02/06/2023 चेसिस क्रमांक : MEC841KBDPP138771 इंजिन क्रमांक : 926956D0144715 निर्माता/मॉडेल : BHARATBENZ 2826C 6X4BSVI N3G-4 वापरलेले इंधन : डिझेल	24/04/2026 रोजी दु. 02 :00 ते सायं. 06:00 वा. पर्यंत 24/04/2026 रोजी दुपारी 05:00 वा. पर्यंत	रु. 25,18,000/- रु. 2,51,800/- रु. 10,000/-	खाता क्र.:31660015181869 नाव : SARFAESI AUCTION PROCEEDS COLLECTION AC आयएफएससी कोड: BARBOWADNAG (पाचवा अक्षर शून्य आहे) वाडी शाखा नागपूर	तारीख: 22/04/2026 रोजी स. 11:00 ते दु. 05:00 वा. पर्यंत

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी आणि इतर शुल्कांसाठी, कृपया https://www.bankofbaroda.com आणि https://baanknet.com या वेबसाइट लिंकचा संदर्भ घ्या/भेट द्या. संभाव्य बोलीदार श्री. सतीशकुमार मानवर, मोबाईल क्र. 8275966084 वर संपर्क साधू शकतात

दिनांक : 09/04/2026
स्थळ : नागपूर
(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा